**<u>वादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०४ यांची उलटतपासणी प्रतिवादीतर्फे विद्वान वकील श्री. व्ही. डी. जाधव यांचेमार्फत शपथेवर पुढे सुरुः-</u>**

४. मी बांधकामासाठी मजुर पुरवत नाही. मी वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये बांधकामा संदर्भात झालेल्या कराराच्या वेळी त्या ठिकाणी हजर नव्हतो. वादी व प्रतिवादीमध्ये करार झाल्याबाबत मला वादीने सांगितले. मी सदर बांधकामाचे अंदाजे ७ महिने काम केले. त्यावेळी माझ्यासोबत सतत चार लोक कामाला होती. सदर घराच्या विट बांधकामाची उंची अंदाजे १२ फुट आहे. हे म्हणणे खरे आहे की, १२ फुट उंचीवर स्लॅब टाकलेला आहे. घराचा दरवाजा पुर्वेला आहे. सदर स्लॅबला चारही बाजुने पाणी जाण्यासाठी उतार दिलेला आहे. सदरच्या घरामध्ये चार ते पाच खोल्या आहेत. सदर बांधकामाला किती विटा लागल्या हे मला माहित नाही. सदर बांधकामाला वाळु कोठुन आणली व किती आणली हे मला माहित नाही. या बांधकामावर किनीगाव वरून मजुर आले होते. वादी व प्रतिवादीमध्ये कराराप्रमाणे काय देणे घेणे होते व किती पैसे राहिले होते याबाबत मला माहित नाही.

५. वादीच्या सांगण्यावरून मी साक्ष देण्याकरिता न्यायालयात आलो आहे. माझा व प्रतिवादीचा संबंध नाही. मी माझ्या मर्जीने न्यायालयात साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीने मला कोर्टात साक्ष देण्याकरिता पैसे दिले. हे म्हणणे खरे आहे की, मी बांधकामासाठी स्वत: मजुर लावले नाहीत किंवा माझे कोणतेही मजुर यांनी बांधकाम केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती,

Digitally signed by PARVEZ ISHAQUEKHAN MOKASHI
Date: 2025.11.05 11:20:34 +0530

(पी. आय. मोकाशी)

दिनांकः-०१.११.२०२५. दिवाणी न्यायाधीश,व. स्तर, औसा.